**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय कोंडीबा क्षीरसागर
प्लॉट क्र. ६६, रामलाल नगर, होटगी रोड,
मजरेवाडी, सोलापूर जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उप जिल्हाधिकारी, सोलापूर — उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७९ / सोलापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. विजय कोंडीबा क्षीरसागर, प्लॉट क्र. ६६, रामलाल नगर, होटगी रोड, मजरेवाडी, सोलापूर जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उप जिल्हाधिकारी, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. सिध्दाराम सालीमठ

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री. बाबासाहेब बी. वाघमोडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.५.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

को-या कागदावरील व रु. २०/-, रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र सांक्षाकित करणेकरिता किती रकमेचे कोर्ट फी स्टॅम्प लावणे आवश्यक आहे याची माहिती. सेतू बाहेरील कामासाठी लागणारे हस्तलिखित प्रतिज्ञापत्रावर सांक्षाकन करुन मिळणेकरिता रु. २०/- ची आकारणी करणेसंबंधी सेतू कार्यालयास देण्यांत आलेल्या आदेशाची प्रत, आदेश सेतू कार्यालयास प्राप्त झाल्याची तारीख, हस्तलिखित प्रतिज्ञापत्रावर सांक्षाकन करुन मिळणेकरिता रु. २०/- ऐवजी रु. १५/- आकारणी करण्याबाबत दि. ६.१.२००६ रोजी दिलेल्या पत्राची प्रत.
संचालक, सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र. डिआयटी / फाईल ०४/ प्र.क्र.०६/३९ दि. २.१२.२००५ चे पत्राची प्रत

## विवेचन

सोलापूरमधील सेतू कार्यालयातील कामकाजासंदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.विजय कोंडिबा क्षीरसागर यांनी मागितली होती. ती मुदतीत न मिळाल्यामुळे श्री.क्षीरसागर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. माहिती देण्यास झालेल्या विलंबाची जन माहिती अधिका-यांनी निवेदन केलेली कारणे मान्य करुन अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर यांनी अपील निकाली काढले व श्री.क्षीरसागर यांना त्याच दिवशी माहिती देण्याचे आदेश जन माहिती अधिका-यांना दिले.

प्रतिज्ञापत्रावरील साक्षांकन करण्यासाठी सेतू समितीकडून २० रुपये सुविधा आकार म्हणून शुल्क आकारले जाते, त्याबाबत १५ रुपये शुल्क कधीपासून अंमलात आले, हा श्री.क्षीरसागर यांच्या पत्रातील एक प्रमुख मुद्दा होता. सॉफ्टवेअरमधील दुरुस्तीशी तो संबंधित असल्याचे जन माहिती अधिका-यांनी विस्ताराने स्पष्ट केल्याचे अपिलीय प्राधिका-यांनी नमूद करुन त्या

संदर्भातील प्रशासकीय आदेशही अपिलाच्या निर्णयात दिला. परंतु जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई झाली नाही म्हणून श्री.क्षीरसागर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.क्षीरसागर यांनी मागणी केलेल्यातील काही माहिती विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, सेतू यांच्याकडील असल्याचे नमूद करुन जन माहिती अधिकाऱ्यांनी त्या मुद्दयासाठी श्री.क्षीरसागर यांचा अर्ज त्या कार्यालयाकडे पाठविला. जन माहिती अधिकारी तथा अपर तहसीलदार, बिगरशेती, सोलापूर यांनी श्री.क्षीरसागर यांना ऊर्वरित माहिती दिली. प्रथम परंतु सुनावणीपूर्वी व ३० दिवसांच्या विहित मुदतीनंतर ही कार्यवाही पूर्ण झाली आहे.

सेतू कार्यालयाकडे मनुष्यबळ कमी असून कामाचा व्याप मोठा आहे. एकएक अधिकाऱ्याकडे तीन-तीन, चार-चार पदांचा अतिरिक्त कार्यभार आहे. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी दि.६.३.२००६ रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, सेतू यांना पत्र पाठविले व त्यांनी दि.२१.४.२००६ रोजी माहिती पाठविली. या दरम्यानच्या काळात सेतूचे नेमके माहिती अधिकारी कोण हे ठरलेले नव्हते. दि.७.४.२००६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने त्याबाबतचे परिपत्रक काढले व दि.१३.४.२००६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सेतू संकलनाकडे अपर तहसीलदार (बिनशेती) यांची जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केली, असे चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.बाबासाहेब बी.वाघमोडे व निवासी उपजिल्हाधिकारी श्री.सिध्दाराम सालीमठ यांनी सांगितले. त्यासाठी पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. दरम्यानच्या काळात सेतूचे तत्कालीन तहसीलदार निवृत्त झाले आहेत. माहिती प्राप्त झाल्यास व त्यानुसार कार्यवाही झाल्यास आपली काही तक्रार राहणार नाही, असे श्री.क्षीरसागर यांनी तोंडी सांगितल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात नमूद केले आहे. आपल्याला पूर्ण माहिती मिळाली असून जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करण्याची अपेक्षा नाही, असे श्री.क्षीरसागर यांनी नमूद केले.

एकूण परिस्थितीचा विचार करता जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास हेतुतः विलंब केल्याचे दिसत नाही, तसेच विलंबाचे कारणही योग्य आहे. अपिलीकर्त्यांनीही शास्तीचा आग्रह धरलेला नाही.

या सर्व बाबींचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

(१) अपील अमान्य.

(२) शास्ती नाही.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे.
दि. १२/२ /२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सहदेव रामचंद्र झेंडे,
रा. भारत भीम ६२६४ , बुधवार पेठ,
छत्रे तालीम गल्ली, मिरज ४१६४१० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
भूविकास बँकेच्या माडीवर, तिसरा मजला, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक , सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले , कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८+३६ / सांगली /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/९/०७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सहदेव रामचंद्र झेंडे, रा. भारत भीम ६२६४ , बुधवार पेठ,
छत्रे तालीम गल्ली, मिरज ४१६४१०.

**जन माहिती अधिकारी** तथा उप निबंधक सहकारी संस्था, हातकणंगले
श्रीमती निलिमा गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५/४/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४/४/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २/५/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५/५/२००६ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित याना लिहिलेले पत्र क्र.३७१३, दि.२९.१२.१९९७ ची प्रत. तसेच सन १९९७ ते २००५-२००६ अखेर वेळोवेळी दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित, वडगाव या संस्थेने स.नं.१२६ हिस्सा क्र.११ यामध्ये असलेल्या दुकान/गाळे विक्रीकामी उपनिबंधक कार्यालयाकडे परवानगीसाठी अर्ज दिला होता किंवा कसे, असल्यास त्या अर्जाची नक्कल व त्या अनुषंगाने केलेली कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या नकला. |

## विवेचन

दि प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था, कसबे वडगाव या संस्थेच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.सहदेव रामचंद्र झेंडे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन श्री.झेंडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. माहिती निःशुल्क देण्याचा आदेश त्यांनी देऊनही प्रत्यक्षात माहिती दिली गेली नाही, म्हणून श्री.झेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'सहकारी पतसंस्थांना केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू नसल्याचे सहकार आयुक्त, निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी स्पष्ट केले आहे,' असे नमूद करुन जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री.झेंडे यांचा अर्ज निकाली काढला. परंतु श्री.झेंडे यांनी संबंधित पतसंस्थेकडे माहिती मागितली नसून त्या संस्थेबाबतची जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती मागितली होती. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी ती देणे आवश्यक होते. जन माहिती अधिकाऱ्यांनी पतसंस्थांना माहितीच्या अधिकाराचा कायदा लागू नसल्याचा अन्वयार्थ चुकीचा लावला आहे. त्यांनी श्री.झेंडे यांना माहिती विनामूल्य द्यावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर श्री.एस.एस.रानगे यांनी दिला. तरीही आपल्याला ही माहिती मिळाली नाही, असे श्री.झेंडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे, तेच प्रतिपादन त्यांनी सुनावणीतही केले. परंतु मागितलेली बव्हंश माहिती ही संस्थेच्या अखत्यारीतील असून संबंधित संस्थेला ही माहिती देण्याबाबत आपण त्वरित कळविले होते. तसेच श्री.झेंडे यांनी

व्यक्तिशः माहिती नेणार असल्याचे नमूद केले असल्यामुळे त्यांना शुल्क कळविले होते, परंतु त्यांनी शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेतली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले श्रीमती निलिमा गायकवाड यांनी सांगितले. त्या संदर्भातील पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. अर्जदारांना कळवूनही उपलब्ध माहिती न घेतल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित माहिती आपल्या कार्यालयाकडे सादर केली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था श्री.एस.एस.रानगे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

संबंधित माहिती अर्जदाराला देण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रयत्न केले आहेत, तसेच श्री.झेंडे यांना कळवूनही त्यांनी ती माहिती प्राप्त करुन घेतली नाही, हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील अमान्य.

(२) जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास माहिती त्वरित व प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशात म्हटल्याप्रमाणे निःशुल्क द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले यांनी दि.१५.२.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे.
दि.७/२/२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सदाशिव दत्तात्रय निकम
रा. टेक्निकल हौसिंग सोसायटी,
प्लॉट क्र.१४, ए-वॉर्ड, वाशी रोड,
जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
जिल्हा सरकारी वकील व सरकारी
अभियोक्ता, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
वरिष्ठ सहाय्यक सरकारी वकील, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८१ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १८.८.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १७.९.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १७.१०.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १३.११.२००७ |
| ६ | **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक दर्शनी भागावर न लावल्यामुळे व माहितीचा अधिकार अधिनियम २००५, नियम ४ प्रमाणे माहिती कार्यालयात ठेवणेबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सदाशिव दत्तात्रय निकम यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नावाचे कार्यालयातील फलकासंदर्भात माहिती मागितली होती. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी समाधानकारक माहिती न दिल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा सरकारी वकील व अभियोक्ता, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. तथापि जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने जिल्हा सरकारी वकील व सरकारी अभियोक्ता कार्यालय, कोल्हापूर यांचेकडून आयोगाने अहवाल प्राप्त करुन घेतलेला असून सदर अहवालान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ०४ प्रमाणे सूचनाफलक लावण्याबाबतची कार्यवाही सदर कार्यालयाकडून करण्यात आलेली असल्याचे अहवालात नमूद केले आहे. आयोगाच्या सूचनेनुसार त्याची छायाचित्रेही त्यांनी पाठविली आहेत. ही बाब विचारात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. ११.२.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. युवराज शामराव जाधव
मु.पो.उरुण, इस्लामपूर, उदय चौक,
ता.वाळवा, जि. सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत कं. मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर, सांगली.

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत कं. मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर, सांगली.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२/९/२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. युवराज शामराव जाधव,मु.पो.उरुण, इस्लामपूर, उदय चौक,
ता.वाळवा, जि. सांगली .

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत कं. मर्यादित,
विभागीय कार्यालय, इस्लामपूर, सांगली.
श्री.आर. डी. चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा उप कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत कं. मर्यादित.
विभागीय कार्यालय, इस्लामपूर, सांगली.
श्री. सुधींद्र कृष्ण नेगलूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २३/१२/२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०/२/२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०/३/२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०/६/२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>मौजे उरुण येथील स.नं.८२३/३ मध्ये असलेल्या दोन बोअरिंग आहेत. यापैकी क्षेत्रावर व एक बोअरिंगवर काही अधिकारी व कर्मचारी यांनी श्री.हणमंत नाना जाधव यांना खोट्या व बनावट कागदपत्रांच्याआधारे अनधिकृत व बेकायदेशीररीत्या शेतीपंपाचे वीज कनेक्शन कसे दिले. | |

## विवेचन

आपल्या मालकीच्या स.नं.८२३/३ मध्ये उरुण-इस्लामपूर येथील जमिनीत श्री.हणमंत नाना जाधव या त्रयस्थ इसमास बेकायदेशीररीत्या शेतीपंपासाठी वीज कनेक्शन दिले, ते बंद करावे, या आपल्या मागणीबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री.युवराज शामराव जाधव या... जन माहिती अधिकारी तथा उप-कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, सांगली यांच्याकडे मागितली होती. त्यांनी आपल्याला चुकीची व भ्रष्ट अधिका-यांना पाठीशी घालणारी माहिती दिली, अशा कारणावरुन श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, सांगली यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.आर.डी.चव्हाण यांच्याकडून आपल्याला आवश्यक असणारी योग्य ती माहिती मिळाली, परंतु जन माहिती अधिकारी तथा उप-कार्यकारी अभियंता यांनी दिशाभूल करणारी माहिती व तीही १८ दिवस विलंबाने दिली,

त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करावी, या मागणीसाठी श्री.जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.युवराज शामराव जाधव यांचा हा विषय गेली अनेक वर्षे ते विविध पातळ्यांवर व विविध अर्जांद्वारे मांडत आहेत. श्री.हणमंत नाना जाधव यांनी खोटी कागदपत्रे सादर करुन अधिकाऱ्यांशी संगनमताने, बेकायदेशीरपणे वीज कनेक्शन घेतले आहे अशी श्री.युवराज जाधव यांची तक्रार असून हे वीज कनेक्शन बंद करावे व दोषी अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी ते विविध अर्जांद्वारे महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या व इतर अनेक अधिकाऱ्यांकडे करीत आले आहेत.

ऑक्टोबर १९९७ मध्ये श्री.हणमंत नाना जाधव यांना वीज कनेक्शन देण्यात आले तेव्हापासून मे २००० पर्यंत श्री.युवराज जाधव यांनी कोणतीही तक्रार केली नव्हती. परंतु त्यानंतर विविध अर्जांद्वारे ते तक्रार करीत आहेत. श्री.हणमंत नाना जधव यांनी सादर केलेल्या कागदपत्रांनुसार नियमानुसार त्यांनी वीज कनेक्शन देण्यात आले आहे. श्री.युवराज जाधव यांच्या तक्रारीनंतर हे कनेक्शन तोडण्याची कार्यवाही केल्याचा प्रयत्न केला असता श्री.हणमंत नाना जाधव यांनी न्यायालयाकडून स्थगिती आणली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.सुधींद्र कृष्णा नेगलूर यांनी केले. आपल्या दृष्टीने हा महत्त्वाचा प्रश्न असून २००३ साली आपण आत्मदहनाची नोटीसही दिली होती. वीज मंडळाच्या तत्कालीन अध्यक्षांच्या सूचनेनुसार तांत्रिक संचालक यांनी दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते, परंतु अशी कारवाई झाली नाही आणि आपल्याला न्याय मिळालेला नाही, असे प्रतिपादन श्री.युवराज जाधव यांनी केले.

श्री.जाधव सन २००० पासून हा विषय मांडत असून त्याबाबतची वस्तुस्थिती वेळोवेळी स्पष्ट करण्यात आली आहे. माहिती देण्यात १८ दिवस विलंब झाला हे खरे आहे, परंतु श्री.जाधव यांनी मागितलेली माहिती एकाच दिवसात व एकाच व्यक्तीकडे असू शकत नाही. विविध ठिकाणांहून ती उपलब्ध करुन द्यावी लागते, असे जन माहिती अधिकारी तथा उप-कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, सांगली श्री.सुधींद्र कृष्ण नेगलूर यांनी नमूद केले.

जमिनीची मालकी, जमिनीचे हस्तांतरण व त्या अनुषंगाने श्री.युवराज शामराव जाधव, श्री.हणमंत नाना जाधव, श्री.जयवंत नाना जाधव आदीमध्ये झालेल्या व्यवहाराची गुंतागुंत या विषयाशी संबंधित आहे. वीज कनेक्शन कायदेशीर की बेकायदेशीर, ते बंद करावे की चालू ठेवावे, हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र त्यांना विहित मुदतीत माहिती दिली जाणे शक्य होते, ती दिली गेली नाही. त्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा उप-कार्यकारी अभियंता श्री.सुधींद्र कृष्ण नेगलूर यांनी केलेले समर्थन स्वीकारार्ह नाही. सन २००० पासून माहिती श्री.युवराज शामराव जाधव यांना सातत्याने दिली जात होती, असे जन माहिती अधिकारी एकीकडे सांगतात, तीच माहिती माहितीच्या अधिकारात केलेल्या अर्जावर देण्यासाठी विविध ठिकाणांहून व विविध व्यक्तींकडून एकत्र करावी लागते, असेही प्रतिपादन करतात, हे परस्परविरोधी आहे. माहिती देण्यासाठी विस्तृत स्वरुपाचा पत्रव्यवहार त्यांनी, तसेच अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.आर.डी.चव्हाण यांनी केला असल्याचे त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. मात्र श्री.युवराज शामराव जाधव यांच्या अर्जात माहितीच्या मागणीपेक्षा आरोप, भाष्य व मतप्रदर्शन हेच अधिक असून कारवाई का करीत नाही या स्वरुपाच्या खुलासेवजा विचारणेवर अधिक भर आहे. तसेच जमिनीच्या व्यवहाराबाबतची गुंतागुंतही त्यात संबंधित आहे. या सर्व बाबी लक्षात घेता माहिती देण्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी हेतुत: विलंब केल्याचे दिसत नाही, श्री.जाधव यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना वारंवार भेटून माहिती घेतली, आवश्यक अभिलेखांची पाहणी करुन माहितीबाबत खात्री करुन घेतली, हे स्पष्टीकरण विचारात घेता विलंबातील काही कालावधी क्षमापित करणे योग्य ठरेल. मात्र ऊर्वरित कालावधीबाबत ते शास्तीस पात्र ठरतात.

उभय बाजूंचे निवेदन व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

(१) अपील अंशत: मान्य.

(२) विलंबातील १० दिवस कालावधी क्षमापित करण्यात येत असून उर्वरित ८ दिवसांसाठी प्रत्येक दिवसाला रु.२५०/- प्रमाणे रु. २०००/- शास्ती जन माहिती

अधिकारी तथा उप-कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, सांगली श्री.एन.के.नेगलूर यांना लावण्यात येत आहे. ती शास्ती माहे फेब्रुवारी देय मार्च महिना या महिन्याच्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावी. याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि.१५.३.२००८ पर्यंत सादर करावा. अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जि.सांगली यांची ही जबाबदारी राहील.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे.**
**दि. ८/२ /२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सर्जेराव अर्जुन धुमाळ
रा. ८/४१, बसवराज अपार्टमेंट,
सर्व्हे क्र.९४/९५, भुसारी कॉलनी,
पौड रोड, कोथरुड, पुणे-३८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उपसंचालक, भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक, भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३२७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१०.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सर्जेराव अर्जुन धुमाळ, रा. ८/४१, बसवराज अपार्टमेंट, सर्व्हे क्र.९४/९५, भुसारी कॉलनी, पौड रोड, कोथरुड, पुणे-३८

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांचे प्रतिनिधी सौ. आर. पी. कोंडार

**जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक,**
उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय, पुणे प्रदेश, पुणे
श्री. चांगदेव शंकर शिंगाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १७.११.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ३.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | ५.६.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे जोगवाडी, ता. भोर, जि. पुणे येथील सन १९८८-८९ साली झालेल्या जमीन एकत्रीकरण गट बांधणी योजनेत झालेली चूक दुरुस्त करण्यात यावी, गट क्र. १२४, ४४६, ४४७, ४१३, ६२२, ६२६ मध्ये गट बांधणी करताना श्री. नथू नागू धुमाळ यांची संमती का घेतली नाही, तसेच वडील अर्जुन भिवा धुमाळ यांचा आंगठा दुसरे कोणीतरी उठवून संमती दर्शविली आहे, झालेल्या गटातील चूक दुरुस्तीबाबत दि. २६.१०.१९९७ रोजी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती मिळावी. | |

## विवेचन

मौजे जोगवाडी, ता. भोर, जि. पुणे या गावी १९८८-८९ साली झालेल्या जमीन एकत्रीकरणासंदर्भात गट बांधणीच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री. सर्जेराव अर्जुन धुमाळ यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक; भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी सौ. आर. पी. कोंडार यांनी अधिनस्त कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घेण्यास काही कालावधी लागणार असल्याने या कामी एक महिन्याची मुदत मिळण्यास विनंती आहेङ, असे कळविले. श्री. धुमाळ यांनी ती मुदत मान्य केली. त्यानंतरही जन माहिती अधिकाऱ्यांकडून कोणतेही उत्तर न मिळाल्यामुळे श्री. धुमाळ यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते नाकारले. आपल्या अर्जाचा योग्य विचार केला गेला नाही व माहिती दिली गेली नाही, या कारणावरून श्री. धुमाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मौजे जोगवाडी येथे सन १९८८-८९ साली आणेवारी करुन गटबांधणी करण्यात आली. गट क्र. १२४, ४४६, ४१३, ६२२, ६२६ या गटात एका हिस्सेदाराची संमती घेतली नाही व आपल्या वडिलांचा अंगठा दुसऱ्या कोणीतरी उठविला. गट क्र. ४४७ चा काही भाग गट क्र. ४४४ मध्ये वर्ग केला. याबाबत दुरुस्ती करुन मिळावी, यासाठी श्री. धुमाळ यांनी दि. २६.१०.१९९७ रोजी अर्ज केला होता. त्या अर्जावर

कोणती कार्यवाही झाली याबाबतची संपूर्ण माहिती कागदपत्रांसह मिळावी व गट बांधणीतील चूक दुरूस्त केली जावी, अशी मागणी श्री. धुमाळ यांनी केली होती. जन माहिती अधिकारी सौ. कोंडार यांनी एक महिन्याची मुदत मागून घेतल्यानंतर पुढील कार्यवाही सहा महिन्यांपर्यंत केली नाही, म्हणून श्री. धुमाळ यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक; भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक; भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे श्री. संभाजी शिंदे यांनी त्यांचे अपील घविनाकार्यवाहीङ फेटाळले. घ्श्री. धुमाळ यांची मुख्य मागणी दि. २७.१०.१९९८ च्या अर्जावर कार्यवाही करुन एकत्रीकरण करुन झालेल्या गट बांधणीत दुरुस्ती करुन मिळावी ही आहे. त्याला अंतिम निकाली उत्तर दिले आहेङ, असे श्री. शिंदे यांनी निकालपत्रात नमूद केले आहे. ( आपला अर्ज दि. २६.१०.१९९८ चा नव्हता, तर दि. २६.१०.१९९७ चा होता असे श्री. धुमाळ यांनी लेखी व तोंडी नमूद केले.)

श्री.शिंदे यांनी नमूद केल्याप्रमाणे श्री. धुमाळ यांची मुख्य मागणी गट बांधणीतील दुरुस्ती करून मिळावी ही आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत ती येत नाही. तसेच वडिलांच्या नावे उठविलेला अंगठा खरा किंवा खोटा, अन्य हिस्सेदारांची संमती का घेतली नाही, हे प्रश्नही या कायद्यांतर्गत विचारात घेता येणार नाहीत. मात्र मूळ अर्जावर केलेल्या कार्यवाहीची कागदपत्रांसह माहिती, संमतीजबाबाच्या सत्य प्रती इत्यादी श्री. धुमाळ यांना दिले जाणे आवश्यक असूनही दिलेले नाही. श्री. धुमाळ यांच्या मूळ अर्जाची चौकशी होऊन तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, भोर, व अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे जिल्हा यांचा अहवाल आल्यानंतर दि. २८.२.२००५ रोजी जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील दि. १७.३.२००४ च्या परिपत्रकाप्रमाणे श्री. धुमाळ यांचा ( दि. २६.१०.१९९७ चा ) अर्ज अंतिम निकाली उत्तर देऊन विना कार्यवाही निकाली काढला आहे, असे श्री. शिंदे यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ ची अंमलबजावणी (दि. १२.१०.२००५) सुरु झाल्यानंतरच्या काही दिवसातच श्री. धुमाळ यांचा अर्ज (दि.१७.११.२००५) आला होता. कायदा नवा असल्यामुळे पुरेशा माहितीअभावी विहित मुदतीत उत्तर दिले गेले नाही; तसेच पाच जिल्ह्यांच्या कार्यभारासह विविध प्रकारच्या कामाचा ताण असल्यामुळे श्री. धुमाळ यांच्या अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही न करण्याची चूक झाली, असे सौ. कोंडार यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

अपीलकर्त्याने दि. २६.१०.१९९७ रोजी केलेला अर्ज चौकशीसाठी तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांच्याकडे दि. ३.१२.१९९७ रोजी पाठविण्यात आल्याचे कागदपत्रावरुन दिसते. त्यांचा व अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे जिल्हा यांचा अहवाल अर्ज केल्यापासून आठ वर्षांनी - म्हणजे सन २००५ साली आला आहे व दि. २८.२.२००५ रोजी अर्ज निकाली काढण्यात आला आहे, असे आयोगाला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. कार्यवाहीबाबतची अहवालांच्या प्रतींसह सर्व माहिती दिली गेली नाही, याची दखल अपिलीय प्राधिकारी श्री. शिंदे यांनी घेणे आवश्यक होते, ती घेतलेली नाही. ही माहिती श्री. धुमाळ यांना त्वरित दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, उपसंचालक; भूमि अभिलेख, पुणे प्रदेश, पुणे सौ. कोंडार यांचे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत असले तरी कार्यभाराची सबब व कोणतेही उत्तर न देण्याची कृती योग्य नाही. त्याबाबत त्यांना कडक समज देण्यात येत आहे.

३. संबंधित विषयातील संमतीजबाब, तसेच तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, भोर व अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे जिल्हा यांचे अहवाल, व अपीलकर्त्याच्या दि. २६.१०.१९९७ च्या मूळ अर्जाच्या अनुषंगाने केलेली अन्य कार्यवाही दर्शविणारा पत्रव्यवहार याच्या प्रती अपीलकर्त्यास त्वरित व निःशुल्क द्याव्यात, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याच्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १०.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ, पुणे

पुणे
दि. २५ .२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. श्रीमंत भानुदास जाधवर
रा. वालवड, पोस्ट चारे,
ता. बार्शी, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कंत्राटी ग्रामसेवक, ग्रामपंचायत वालवड,
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६७ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. श्रीमंत भानुदास जाधवर
रा. वालवड, पोस्ट चारे, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, बार्शी, जि.सोलापूर श्री. विकास दा.दांगट

**जन माहिती अधिकारी** तथा कंत्राटी ग्रामसेवक, ग्रामपंचायत वालवड,
ता. बार्शी, जि. सोलापूर श्री. विनायक व्यंकटराव बैंडले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.१०.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सप्टेंबर २००० ते जुलै २००६ या कालावधीतील -

वालवड ग्रामपंचायतीच्या मासिक सभा व ग्रामसभेच्या प्रोसीडिंगच्या छायांकित प्रती, संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनांतर्गत झालेल्या कामाची माहिती, मजुरांचे मस्टर, धान्य वाटप कूपन, उचललेल्या धान्याचा तपशील व धान्य वाटप केल्याचे रजिस्टर सत्यप्रत. विविध प्रकारचे करवसूल, सार्वजनिक मारुती मंदिर पाडलेल्या साहित्याचे लिलावाद्वारे जमा केलेल्या रकमेची तपशीलवार माहिती, वर्गणी, देणगी, पैसे, वस्तुरूपात जमेची तपशीलवार माहिती, २००० ते २००६ मधील लेखापरीक्षण अहवाल, ग्रामपंचायतीच्या बँक पासबुकाच्या छायांकित प्रती

## विवेचन

अपीलकर्ता श्री.श्रीमंत भानुदास जाधवर यांनी वालवड, ता.बार्शी येथील ग्रामपंचायतीकडील विविध कामांच्या संदर्भातील माहिती व कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. सप्टेंबर २००० ते जुलै २००६ या कालावधीतील ही माहिती असून जन माहिती अधिकारी / ग्रामसेवक यांनी कोणतीही माहिती दिली नाही म्हणून श्री.जाधवर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी यांच्याकडे अपील केले. अपील अर्जासोबत मागितलेल्या माहितीची सत्यप्रत जोडलेली नसल्यामुळे व प्रतिज्ञापत्र सोबत नसल्यामुळे अर्ज दप्तरी दाखल केला गेल्याचे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१ श्री.संजय चिल्लाळ यांनी श्री.जाधवर यांना कळविले. त्याविरुध्द श्री.जाधवर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

वालवड ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक व त्यांचे अन्य साथीदार यांनी विविध कामांमध्ये भ्रष्टाचार केला आहे, बनावट कागदपत्रांसह अनेक गंभीर अपराध केले आहेत, ते उघडकीला आणण्यासाठी व दाद मागण्यासाठी आपण ही माहिती मागितली होती. तत्कालीन गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, करमाळा श्री.विजय मुळीक यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या आदेशानुसार या आरोपांची चौकशी केली होती. त्यात आपल्या म्हणण्याला पुष्टी मिळणारे निष्कर्ष आहेत, असे श्री.जाधवर यांनी चौकशी अहवालाच्या प्रतीसह लेखी व तोंडी निवेदन केले. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.आर.बी.गायकवाड भ्रष्टाचारात सहभागी होते म्हणून त्यांनी माहिती दिली नाही, तर अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.चिल्लाळ यांनी ग्रामसेवकाला पाठीशी घालण्यासाठी व खोटी कागदपत्रे तयार करण्यासाठी वेळ मिळावा म्हणून अपिलाची दखल घेतली नाही, असा आरोप अपीलकर्ता श्री.श्रीमंत जाधवर यांचे प्राधिकृत प्रतिनिधी श्री.बाबूराव किसनराव जाधवर यांनी केला. तत्कालीन ग्रामसेवक श्री.गायकवाड हे सध्या निलंबित असून गटविकास अधिकारी श्री.चिल्लाळ हे रजेवर आहेत. गटविकास अधिकारीपदाची सूत्रे आठ दिवसांपुरती आपल्याकडे आहेत, असे श्री.विकास दांगट यांनी सांगितले. श्री.गायकवाड हे दि.२४.२.२००७ पासून निलंबित असल्यामुळे ग्रामसेवकपदी आपली नियुक्ती झाली आहे, ग्रामपंचायतीकडील माहिती अधिकारांतर्गत कोणत्याही अर्जाची व त्याबाबतच्या कार्यवाहीची कागदपत्रे श्री.गायकवाड यांनी आपल्याकडे सुपूर्त केलेली नाहीत त्यामुळे नवीन दप्तर ठेवून आपण कामकाज करीत आहोत, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कंत्राटी ग्रामसेवक श्री.विनायक व्यंकटराव बेंडले यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

सादर करण्यात आलेली कागदपत्रे व उभय बाजूंची निवेदने पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गायकवाड यांनी माहितीच्या अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही, त्यामुळे ते शास्तीस पात्र ठरतात. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.संजय चिल्लाळ यांनी केलेला लेखी खुलासा तकलादू आहे. श्री.जाधवर यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे माहितीचा तपशील दिलेला नव्हता, त्यामुळे अर्जातील हवी असलेली माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना सूचना देता आल्या नाहीत. त्यामुळे माहितीचा तपशील कळावा म्हणून

दि.६.१०.२००६ च्या पत्रानुसार त्यांना कळविण्यात आले आहे. असे श्री.चिल्लाळ यांनी सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे. अर्जदाराना हव्या असलेल्या माहितीचा तपशील कळवावा, असे त्यांच्या ६.१०.२००६ च्या पत्रात म्हटलेले नाही, तर मागितलेल्या माहितीची सत्यप्रत व प्रतिज्ञापत्र नसल्यामुळे अर्ज दप्तरी दाखल करण्यात आल्याचे कळविले आहे. माहिती देण्याबाबत जनमाहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी तत्परता व सकारात्मक दृष्टिकोन बाळगलेला नाही, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

श्री.जाधवर यांनी मागितलेली सर्व माहिती दि.१२.१०.२००७पर्यंत नि:शुल्क द्यावी असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. (त्यानुसार श्री.जाधवर यांना दि.५.१०.२००७ रोजी सर्व माहिती देण्यात आल्याचे त्यांची पोहोच असलेल्या पत्रासह दि.८.२०.३००७ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, वर्ग-१ श्री.संजय चिल्लाळ यांनी अहवाल आयोगाला सादर केला आहे.)

आयोगाचा आदेश खालीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) विद्यमान ग्रामसेवक श्री.विनायक व्यंकटराव बेंडले यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री.आर.बी.गायकवाड यांना लेखी कळवूनही कोणताही खुलासा त्यांनी सादर केलेला नाही. माहिती न देण्याबद्दल श्री.गायकवाड यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. ही रक्कम त्यांच्याकडून १० समान हप्त्यात वसूल करुन ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही गटविकास अधिकारी तथा अपिलीय प्राधिकारी श्री.संजय चिल्लाळ यांनी करुन त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच सदर

शास्तीची नोंद संबंधितांच्या गोपनीय अहवाल व सेवापुस्तकात घेऊन त्याचा पूर्तता अहवाल सादर करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची राहील.

(३) अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी श्री.संजय चिल्लाळ यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अपिलांची विहित मुदतीत व गांभीर्याने दखल घेऊन कार्यवाही करण्याची समज देण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे.
दि. २५/२ /२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे
२१, सिध्देश्वर नगर, विजापूर रोड,
भारती विद्यापीठ जवळ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हाधिकारी, सोलापूर — उत्तरवादी
जि. सोलापूर

जन माहिती अधिकारी तथा
चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे, २१, सिध्देश्वर नगर, विजापूर रोड, भारती विद्यापीठ जवळ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सोलापूर
श्री. के. एच. गोविंदराज

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. अपर जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये कोणती, त्यांना दिलेल्या कामाचा इष्टांक, त्यांनी केलेल्या पूर्ततेची महिनावार माहिती २. जिल्ह्यातील कोणत्या गोदामाची मासिक, तिमाही तपासणी केली त्याची माहिती ३. मोहोळ येथे कोणकोणत्या तारखेस भेट दिली व भेटीत केलेली कामे ४. शासकीय गोदाम मोहोळ येथे भेट दिल्याची तारीख, तपासणीमध्ये काढलेल्या शकांची यादी, गोदाम तपासणी केली नसल्यास त्याची कारणे ५. मोहोळ गोदामामध्ये झालेल्या अपहाराबाबत अहवाल कोणाकडे सादर केला ६. जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेची कोणती कामे कोणत्या तारखेस तपासली त्याची माहिती ७. स्वामी समर्थ सहकारी गृह निर्माण संस्था सोलापूर यांना मंजूर केलेल्या न.भू.क्र.८३८८/४अ याबाबत चौकशी करुन पाठविलेल्या अहवालाची सांक्षाकित प्रत

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे यांनी अपर जिल्हाधिकारी यांची कर्तव्ये, त्यांनी केलेली कामे आदी १२ मुद्दयांची सन २००४ ते २००६ या काळातील विस्तृत माहिती मागितली होती. स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्था, सोलापूर यांना मंजूर केलेल्या भूखंडाबाबतच्या चौकशी अहवालाची साक्षांकित प्रत ही त्यातील मुख्य मागणी होती. जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर यांनी हा अहवाल गोपनीय असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८(जी) प्रमाणे ही माहिती देता येत नसल्याचे कळविले. (मूळ पत्रात त्यांनी ८(ग) असा उल्लेख केला होता, परंतु ८(जी) चे भाषांतर केल्यामुळे चुकीचा उल्लेख झाला व प्रत्यक्षात ते इंग्रजी ८(जी) व मराठी ८(१)(छ) असे हवे होते, असा खुलासा जन माहिती अधिकारी तथा चिटणीस श्री.बाबासाहेब वाघमोडे यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढे केल्यानंतर अपिलीय प्राधिकाऱ्यांनी तो मान्य केला.) त्याविरुध्द श्री.अक्कलकोटे यांनी स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्थेबाबतचा चौकशी अहवाल या एका विषयाच्या संदर्भातच

अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. कलम ८(१)(छ) नुसार माहिती प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास किंवा शारिरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत / केलेले सहाय्य ओळखता येईल, म्हणून चौकशी अहवालाची साक्षांकित प्रत देता येणार नाही, हा जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सोलापूर श्री.के.एच.गोविंदराज यांनी मान्य केला. आपण अन्यायाविरुध्द झगडत असून महसूल खात्यात ३८ वर्षे सन्मानपूर्वक सेवा केली आहे, आपल्याविरुध्द कोणत्याही गुन्ह्याची नोंद नाही. असे असताना आपल्यापासून अन्य कोणाच्या सुरक्षिततेला धोका आहे असे म्हणणे आक्षेपार्ह आहे, तसेच संबंधित माहिती गोपनीय नाही, त्यामुळे ती आपल्याला दिली जाणे आवश्यक होते, असे प्रतिपादन श्री.अक्कलकोटे यांनी केले.

उपरोक्त संस्थेत सदस्यांमध्ये आपआपसात वाद असून त्यातून झालेल्या तक्रारीमधून चौकशी केली गेली. सोलापूर महानगरपालिकेच्या कर विभागासह अनेक खात्यांमधील अधिकारी व खाजगी व्यक्ती यांच्याकडून अपर जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशीकामी माहिती घेतली आहे. चौकशी पूर्ण होण्यापूर्वी व अंतिम निर्णय घेण्यापूर्वी ती माहिती व नावे जाहीर झाली असती तर निर्णयप्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता होती, हे लक्षात घेऊन त्यावेळी माहिती देणे उचित नव्हते, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी श्री.के.एच.गोविंदराज यांनी केले. दरम्यान राज्य माहिती आयोगाने सुनावणी निश्चित केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी दि.१४.२.२००७ रोजी पत्रकार परिषद घेऊन चौकशीबाबतची माहिती जाहीर केली आहे. या स्थितीत गोपनीयतेचा प्रश्न उरत नाही, असा दावा श्री.अक्कलकोटे यांनी केला. अहवालावरील निर्णय अलीकडेच (पंधरवड्यापूवीच) घेतला असल्याचे श्री.गोविंदराज यांनी स्पष्ट केले.

श्री.अक्कलकोटे यांनी माहिती मागितली तेव्हा चौकशी अपूर्ण होती, हे लक्षात घेता त्यामधील तपशील जाहीर न करण्याचा अपिलीय प्राधिकाऱ्यांचा निर्णय योग्य आहे. मात्र, स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्था, सोलापूर यांना मंजूर केलेल्या भूखंडाशी संबंधित २६ संचालकांपैकी अनेकांनी व्यक्तिशः व कुटुंबाच्या नावावर स्थावर मालमत्ता असूनही प्रतिज्ञापत्रावर 'बेघर'

असल्याचे दाखवले आहे, असे नमूद करुन त्याबद्दलच्या चौकशीची मागणी श्री.जवाहरलाल चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये अपर जिल्हाधिकाऱ्यांनी ही चौकशी केली. सार्वजनिक व्यवहाराच्या संदर्भातील ही चौकशी असल्यामुळे गोपनीयतेचा मुद्दा गैरलागू आहे. तसेच संबंधितांच्या जीविताला धोका असण्याचा मुद्दा ग्राह्य मानण्याएवढा कोणताही ठोस पुरावा उत्तरावादी देऊ शकलेले नाहीत. विश्वासाने माहिती देणाऱ्या सर्वच व्यक्तींची नावे जाहीर करणे योग्य आहे की नाही, हे संबंधित विषयाचे स्वरुप, ती ती विशेष व्यक्ती आणि त्यांनी दिलेल्या माहितीचे स्वरुप यावर अवलंबून राहील. सरसकट कलम ८(१)(छ) गृहीत धरता येणार नाही. प्रस्तुत प्रकरणात संपूर्ण अहवालाची साक्षांकित प्रत देण्यामध्ये यातील कोणतीही बाब आड येण्याचे कारण नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) स्वामी समर्थ गृहनिर्माण संस्था, सोलापूर यांना मंजूर केलेल्या भूखंडाबाबत चौकशी करुन अपर जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या अहवालाची साक्षांकित प्रत अपीलकर्त्यास आठ दिवसात निःशुल्क द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या दिवशीच दिला होता. (यानुसार पूर्तता केल्याचे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालय श्री.बाबासाहेब वाघमोडे यांनी दि.१६.१०.२००७ च्या पत्रामध्ये प्राप्त दि.२२.१०.२००७ आयोगाला कळविले आहे.)

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे.
दि. १२/२/२००८

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. रामभाऊ दगडू खंडागळे
महर्षी कॉलनी, आझाद चौक, अकलूज,
ता.माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०१

अपीलकर्ता

**विरुध्द**

उत्तरवादी

**अपिलीय प्राधिकारी** तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,सोलापूर
जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३८४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. रामभाऊ दगडू खंडागळे, महर्षी कॉलनी, आझाद चौक, अकलूज, ता.माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०१

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर, जि. सोलापूर श्री. अशोक द. भांडवलकर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, अकलूज, ता. माळशिरस, जि. सोलापूर श्री. राजेंद्र गंगाधर गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

अ. सन १९८७-१९८८ साली संस्थेचे पुनरुज्जीवन झालेवेळची माहिती

१. गाव व शेअर्सचे रक्कमेसह सभासदांची यादी

२. त्यावेळी स्वीकारलेली उपविधी

सन २००४-०५ मधील माहिती

३. सभासद यादी. ४. सन १९८७-८८ नंतर दुरुस्ती केली असल्यास अद्यावत माहिती

५. ज्या आधारे मयत सभासदांची वारसांची नोंद कायम केली त्याचे पुरावे

६. लेखा परीक्षण अहवाल

७. वार्षिक सर्व साधारण सभेच्या नोटिसीची प्रत

८. वार्षिक सर्व साधारण सभेस उपस्थित असणाऱ्या सभासदांची यादी

९. वार्षिक सर्व साधारण सभेतील ठराव

सन २००५-०६ मधील माहिती

१०. संचालक मंडळाची यादी.

११. संचालक मंडळ निवडून आलेची तारीख

१२. संचालक मंडळाच्या निवडणूक प्रक्रियेच्या तपशिलासह निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा अहवाल

## विवेचन

माळशिरस तालुका मातंग दोरखंड उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, अकलूज, ता. माळशिरस या संस्थेच्या संदर्भातील १२ मुद्दयांची माहिती अपीलकर्ता श्री. रामभाऊ दगडू खंडागळे यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज, ता.माळशिरस यांच्याकडे मागितली होती. संबंधित संस्थेकडून ही माहिती प्राप्त करुन घ्यावी, असे जन माहिती अधिका-यांनी त्यांना कळविले. मात्र सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था कार्यालयाकडेच असणारी माहिती आपण मागितली होती. संस्थेकडून माहिती घेण्यास कळविले हे योग्य नाही, तसेच संबंधित अर्ज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अकलूज यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार पाच दिवसांच्या मुदतीत संबंधित

संस्थेकडे आपला अर्ज पाठविणे आवश्यक होते. ते केले नाही. तसेच पुढील अपिलांच्या संदर्भात माहिती देणे आवश्यक असून ती दिली नाही. या कारणावरुन श्री. खंडागळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्याकडे अपील केले. संदर्भित संस्थेच्या पुनरुज्जीवनाबाबतची स्थापना, मान्यता व धारिका, लेखापरीक्षण अहवाल व अन्य कोणतीही माहिती आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. म्हणून आपण संबंधित संस्थेकडून ही माहिती घेण्यास श्री. खंडागळे यांना कळविले, असे जन माहिती अधिका-यांनी केलेले स्पष्टीकरण व या संस्थेला कोणतेही भरीव शासकीय आर्थिक सहाय्य मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, हे जन माहिती अधिका-यांचे प्रतिपादन मान्य करुन अपिलीय प्राधिका-यांनी श्री. खंडागळे यांचे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री. खंडागळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

माळशिरस तालुका मातंग दोरखंड उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, अकलूज या संस्थेची नोंदणी सन १९४९ साली झालेली आहे. मध्यंतरी संस्था काही काळ बंद होती व १९८७-८८ साली तिचे पुनरुज्जीवन झाले तेव्हापासूनची माहिती श्री. खंडागळे यांनी मागितली होती. आपल्या कार्यालयात यातील कोणतीही माहिती उपलब्ध होत नसल्यामुळे संस्थेकडून ही माहिती घ्यावी, असे श्री. खंडागळे यांना कळविताना आपण माहिती श्री. खंडागळे यांना त्वरित देण्याच्या सूचना संबंधित संस्थेचे अध्यक्ष व सचीव यांना लेखी कळविल्या होत्या, असे जन माहिती अधिकारी श्री. राजेंद्र गंगाधर गायकवाड यांनी नमूद केले. तसा पुरावा त्यांनी सादर केला.

संस्थेच्या पदाधिका-यांशी व संस्थेशी संपर्क साधून माहिती मिळविण्याचा आपण प्रयत्न केला. परंतु माहिती मिळाली नाही, म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील कलम ८० अन्वये तहसीलदार, माळशिरस यांच्याकडून दप्तराचा ताबा मिळवून देण्याबाबत विनंती केली. त्यांनी अद्याप आदेश पारित केले नसल्यामुळे पोलिसांमार्फत शोध घेऊन दप्तराचा ताबा मिळविता आला नाही. त्यामुळे आपल्या कार्यालयाने दि. ११.९.२००७ रोजी संस्था आपल्या अवसानयात घेणेबाबत अंतरिम आदेश पारित केले असून सर्व संचालक, सचीव यांना पोलिसांकडे गुन्हा नोंदविण्याबाबत नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री. राजेंद्र गंगाधर

गायकवाड यांनी लेखी व तोंडी विस्ताराने नमूद केले. 'सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अपीलकर्ता हे स्वत: माळशिरस तालुका मातंग दोरखंड उत्पादक सहकारी संस्था मर्यादित, अकलूज, ता. माळशिरस या संस्थेचे सचीव आहेत व त्यांच्या सहीची आर्थिक पत्रके, संचालक मंडळाची यादी, सभासद यादी, सन १९९९ ते २००६ चे लेखापरीक्षण अहवालासोबत कागदपत्रे जोडलेली आहेत, ज्यावेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे समोर अपिलाचे कामकाज चालू होते. दि. २२.८.२००६ ते दि. ७.१०.२००६ या कालावधीमध्ये संस्थेचे सर्व दप्तर, अपीलकर्ते यांचे ताब्यात होते व ते सदर संस्थेचे सचीव म्हणून कामकाज करीत होते व आजही करत आहेत. तेव्हा त्यांना हवी असलेली सर्व माहिती सचीव या नात्याने या कार्यालयास पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांची आहे. त्यांनी स्वत:च संस्थेचे दप्तर नष्ट केले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपीलकर्ते यांचे म्हणण्यानुसार प्रस्तुत संस्थेस शासकीय मदत असेल व ती सरकारी प्राधिकरण असेल तर अपिलामध्ये नमूद केलेली सर्व माहिती या अपिलीय प्राधिकरण व या कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी सचीव म्हणून त्यांची स्वत:ची आहे,' असे जन माहिती अधिकारी श्री. राजेंद्र गंगाधर गायकवाड यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

आपण स्वत: संस्थेचे सचीव आहोत. पण अन्य पदाधिका-यांकडून आपल्याकडे कोणतीही कागदपत्रे दिली गेलेली नाहीत, असे श्री. खंडागळे यांनी सांगितले.

दि. ३१.३.१९८७ रोजी संस्थेचे पुनरुज्जीवन झाल्याची नोंद आहे. तथापि सहकार निबंधक कार्यालयाकडे आदेश उपलब्ध नाही. 'अ' धारिकेबाबत संबंधित कर्मचा-यांकडून खुलासा मागविण्यात आला असून पोलिसांकडे तक्रार नोंदविली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर श्री. अशोक द. भांडवलकर यांनी दि.२५.१०.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. तसेच उपलब्ध माहिती देऊ केली असता ती नको असल्याचे अपीलकर्त्याने सांगितल्याचेही त्या निवेदनात म्हटले आहे.

संस्थेला भरीव आर्थिक सहाय्य मिळाले नसले तरी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमानुसार तिची नोंदणी झाली आहे. सहकार खात्याचे संस्थेवर पूर्ण नियंत्रण आहे. सहकारी दोरखंड सोसायट्यांना शासनाकडून सवलतीत कच्चा माल एकाधिकाराने दिला जातो, तसेच

संस्थेची उत्पादने हमी भावात खरेदी करणेसाठी शासकीय कार्यालये, एस.टी., शेती व अन्य महामंडळांना बंधनकारक केले आहे. विविध योजनांनुसार खादी ग्रामोद्योग महामंडळाकडून आर्थिक लाभ व सवलती संस्थेला मिळत आल्या आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संस्थेला लागू होतो, असे प्रतिपादन श्री. खंडागळे यांनी लेखी व तोंडी केले. हे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते व ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येते.

उभय बाजूंची निवेदने व एकूण संदर्भ, सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र अपीलकर्ता स्वतः संस्थेचे सचीव आहेत. उपलब्ध माहितीबाबतची त्यांची भूमिका संशयास्पद आहे. या संशयाचे साधार निराकरण ते करु शकलेले नाहीत. माहितीच्या संदर्भात स्वतःची जबाबदारी असताना जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यावर आरोप करण्याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

३. शास्ती नाही.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ, पुणे

पुणे
दि. २७.२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सतीश दत्तात्रय रकटे,
बी-२, पोस्टल कॉलनी, पंढरपूर,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार, पंढरपूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. सतीश दत्तात्रय रकटे, बी-२, पोस्टल कॉलनी, पंढरपूर,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर
ता. पंढरपूर, जि. सोलापूर श्री. विवेक प्रल्हाद साळुंके

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे पुळूज, ता. पंढरपूर येथील गट क्र. २२६(१), ७/१२ उताऱ्यावर ०.२० आर जमीन दर्शविण्यात आल्यासंबंधी श्री. शहाजहाँन मुलाणी यांच्या दि. १४ फेब्रुवारी २००६ च्या अर्जान्वये विचारणा करण्यात आली आहे, या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती

## विवेचन

जमीनीच्या मोजणीच्या संदर्भात श्री. शहाजहाँन मुलाणी यांनी केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता श्री. सतीश दत्तात्रय रकटे यांनी मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरून श्री. रकटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पंढरपूर यांच्याकडे अपील केले. या अपिलाची दखल घेतली गेली नाही व माहितीही मिळाली नाही, म्हणून श्री. रकटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सन १९८० साली भूमिअभिलेख मोजणीनुसार ठरविलेल्या क्षेत्राबाबतचा हा विषय आहे. श्री. मुलाणी यांनी केलेल्या अर्जात ०.२० आर क्षेत्र कमी दर्शविल्याबाबत तक्रार केली आहे व त्याबाबतची चौकशी होऊन अहवाल मिळण्याची मागणी केली आहे. ०.२० आर ही जमीन कमी कशी झाली हे श्री. मुलाणी यांना कळविले नाही, असे श्री. रकटे यांनी सांगितले. फेरफारानुसार जमीन कमी झाली असून त्याचा तपशील श्री. मुलाणी व श्री. रकटे यांना देण्यात आला आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पंढरपूर श्री. विवेक प्रल्हाद साळुंके यांनी सांगितले. कमी झालेल्या क्षेत्राबाबतची कार्यवाही हा श्री. रकटे यांचा मुख्य विषय असल्याचे सुनावणी दरम्यान स्पष्ट झाले. एवढ्या क्षेत्राची नुकसान भरपाई मिळाली तरी चालेल, असे श्री. रकटे यांनी सांगितले.

कमी झालेल्या क्षेत्राची भरपाई करणे हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत तो येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या माहितीचा अधिक तपशील हवा असल्यास जन माहिती अधिकाऱ्यांनी निःशुल्क द्यावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ, पुणे

पुणे
दि. २७.२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शिवाजी हणमंत सुगरे
सलगर वस्ती, डोणगाव रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
पोलिस आयुक्त ( मुख्यालय ),
सोलापूर शहर, जि. सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
पोलिस उप आयुक्त ( मुख्यालय ),
सोलापूर शहर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४०/ सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपिलीय अधिकारी** तथा पोलिस उप आयुक्त ( मुख्यालय ), सोलापूर शहर, जि. सोलापूर श्री. शा.रा. दिघावकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>शिक्षण खाते ( प्राथमिक ) यांचेकडून सन १९९८ पासून अंदाजे ३ कोटी शासकीय रकमेच्या झालेल्या अपहारासंबंधी केलेल्या लोकशाही दिनाच्या अर्जाच्या अनुषंगाने दि.२९.८.२००५ रोजी सर्व संबंधितांकडून घेतलेले जाब-जबाब व त्यावरुन पोलिस खात्याने घेतलेला निर्णय, अहवाल, संबंधित तक्रारदारास कळविलेल्या पत्राची, त्यांच्या पोहचची व जिल्हाधिकारी यांना याबाबत कळविलेल्या पत्राची नक्कल |

## विवेचन

सन १९८८ पासून प्राथमिक शिक्षण विभागामध्ये झालेल्या अपहाराच्या संदर्भात लोकशाही दिनात दिलेल्या अर्जावरील कार्यवाहीच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी माहिती मागितली होती. योग्य माहिती अधिकाऱ्याकडे व विहित नमुन्यात अर्ज नसल्याच्या कारणावरुन श्री. सुगरे यांचा अर्ज व त्यांनी केलेले प्रथम अपील जन माहिती अधिकाऱ्यांनी निकाली काढले. त्याविरुध्द श्री.सुगरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. सुगरे यांचा मूळ अर्ज व त्यांनी दाखल केलेले प्रथम अपील निकाली काढताना त्यांना योग्य त्या संबंधित अधिकाऱ्यांची माहिती देण्यात आली होती व त्यांच्याकडे अर्ज / अपील करण्यास सांगण्यात आले होते. परंतु तसा अर्ज त्यांनी केला नाही, त्यामुळे पुढील प्रक्रिया पूर्ण करता आली नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), सोलापूर शहर श्री. शा.रा. दिघावकर यांनी सांगितले. अर्ज निकाली काढण्याऐवजी संबंधित जन माहिती अधिकाऱ्याकडे पाठविणे आवश्यक होते, असे श्री. सुगरे यांनी अपिलात म्हटले आहे. जानेवारी २००६ मधील अर्ज व मार्च २००६ मधील प्रथम अपील आहे. कायदा नुकताच अस्तित्वात आला होता, त्यामुळे या तांत्रिकतेची कल्पना नसल्यामुळे चूक झाली, असा खुलासा श्री. दिघावकर यांनी केला. संबंधित विषयाबाबत आतापर्यंतच्या चौकशीच्या कागदपत्रांच्या प्रतींच्या मागणीबरोबरच संबंधित प्रकरणात आणखी काही व्यक्तींचे जाब जबाब घेतले पाहिजेत, अशी श्री. सुगरे यांची

मागणी आहे. तो प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे, त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत त्याचा विचार केलेला नाही, असे श्री. दिघावकर यांनी नमूद केले.

वेळेत माहिती मिळावी, व मुदतीत कार्यवाही न झाल्यामुळे दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी श्री. सुगरे यांनी केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या प्रारंभीच्या काळातील अर्ज व अपील असल्यामुळे उभय बाजूंकडून तांत्रिक चूक झाल्याचे अनेक अपिलांमध्ये दिसून येते. त्यामुळे श्री. दिघावकर यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. मात्र संबंधित विषयातील चौकशीच्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यांस दिल्या जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. संबंधित प्रकरणाच्या सुनावणीच्या तारखेपर्यंतच्या चौकशीबाबतची संपूर्ण माहिती अपीलकर्त्यांस नि:शुल्क व त्वरित द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १५.३.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. २७.२.२००८**